International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 4 March-April 2024

# इस्लामपूर आगारातील महिला बस वाहकांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास

**प्रा. डॉ. सुनंदा राम परीट**
सहाय्यक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा जि. सांगली.
**Corresponding Author: - प्रा. डॉ. सुनंदा राम परीट**
**Email:** sunandaparit1986@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.11208146**

**प्रस्तावना:**

एस. टी बस ही महाराष्ट्रातील प्रत्येक गावची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाते. सर्व नागरीकांना खेड्यापाड्यात पोहचवणारी ही लाल परी म्हणजे राज्य परिवहन महामंडळाची बस. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ही महाराष्ट्र राज्यात रस्त्यावरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी स्थापन झालेली सरकारची कंपनी आहे. वाहनांद्वारे सार्वजनिक प्रवासी वाहतुकीची सुरवात महाराष्ट्रात १९३२ च्या सुमारास खासगी व्यावसायिकांद्वारे सुरु झाली. त्यापुढे आठ ते दहा वर्षात या वाहतुकीचे नियमन करण्याची गरज भासू लागली. १९४७ मध्ये ब्रिटिश राजवट संपुष्टात आली.

स्वतंत्र भारताच्या मुंबई प्रांतात १९४८ मध्ये बाँबे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (BSRTC) या नावाने प्रवास करण्यासाठी सरकारी कंपनी स्थापन करण्यात येऊन प्रवाशांच्या वाहतुकीचा एकाधिकार या कंपनीला बहाल करण्यात आला. BSRTC ची पहिली बस १ जून १९४८ या दिवशी पुणे ते अहमदनगर या मार्गावर धावली. ही बस पुणे येथिल पहिले चालक तुकाराम पाडुरंग पठारे व वाहक लक्ष्मण केवटे यांनी चालवली. सध्या सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत असून बसमध्येही महिला वाहक मोठ्या प्रमाणात सेवा बजावत असल्याचे दिसते. नाशिक ते सिन्नर मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (MSRTC) बस चालवणारी पहिली महिला म्हणून माधवी साळवे यांनी इतिहास रचला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

सदर अभ्यासाची पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) इस्लामपूर आगारातील महिला बस वाहकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२) इस्लामपूर आगारातील महिला बस वाहकांच्या समस्या जाणून घेणे
३) इस्लामपूर आगारातील महिला बस वाहकांच्या समस्यांवर उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

चूल आणि मूल या चाकोरीत न राहता महिलांनी सर्वच क्षेत्रात भरारी घेतली आहे. पुरुषांची मक्तेदारी झालेले वाहन चालविण्याचे क्षेत्रही महिलांनी मोडित काढले आहे. याचाच एक भाग म्हणून सन २००३ -०४ पासून एस.टी महामंडळाने एस.टी मध्ये महिला वाहक व चालक भरती करण्यास सुरुवात केली आणि एस.टी मध्ये महिला वाहकही रुजू झाल्या. सदर संशोधनासाठी साधा यादृच्छिक नमुना पद्धतीचा अवलंब करणेत आला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा वापर करून आवश्यक माहिती गोळा करणेत आली आहे. वाहक म्हणून काम करताना त्यांना कोणत्या चांगल्या व वाईट गोष्टींचा सामना करावा लागतो, त्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर, त्यांना मिळणाऱ्या सोयी व सवलती याबाबतचा अभ्यास या संशोधन पेपरमध्ये केला आहे. यासाठी इस्लामपूर आगारातील महिला वाहकांचा नमुना सर्वेक्षण केले आहे. इस्लामपूर आगारामध्ये एकुण २५ महिला वाहक कर्मचारी असून त्यापेकी 50% म्हणजे १२ महिलांची मुलाखत घेण्यात आली आहे.

**वय:**

महिला बस वाहकांची वयोमानानुसार विभागणी पुढील तक्ता क्र. १ मध्ये दाखवण्यात आली आहे. १८ ते २० वर्षे या वयोगटातील एकही महिला बस वाहक इस्लामपूर आगारामद्धे कार्यरत नाही. सर्वात जास्त ३१ ते ४० या वयोगटातील (४१.६७%) महिला बस वाहक आढळून आले. सर्वात कमी ३३.३३ % महिला बस वाहक वय वर्षे ४१ ते ५० या वयोगटातील असल्याचे दिसून आले.

**तक्ता क्र. १ वय**

| अ. क्र. | वय (वर्षे) | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | १८ ते २० | ०० | ००.०० |
| २. | २१ ते ३० | ०१ | ०८.३३ |
| ३. | ३१ ते ४० | ०५ | ४१.६७ |
| ४. | ४१ ते ५० | ०४ | ३३.३३ |
| ५. | ५१ पेक्षा जास्त | ०२ | १६.६७ |
| एकूण = | | १२ | १००.०० |

**स्त्रोत : क्षेत्र भेट**

**वैवाहिक स्थिती:**

महिला बस वाहकांची वैवाहिक स्थिती पुढील तक्ता क्र. २ मध्ये दर्शविण्यात आली आहे. नमूना निवड केलेल्या एकूण महिला बस वाहकांपैकी सर्वाधिक ७५ % महिला बस वाहक विवाहित असून १६.६७ % महिला बस वाहक अविवाहित असल्याचे दिसून आले. केवळ १ महिला बस वाहक विधवा असल्याचे दिसून आले.

**तक्ता क्र. २ वैवाहिक स्थिती**

| अ. क्र. | वैवाहिक स्थिती | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | विवाहित | ०९ | ७५.०० |
| २. | अविवाहित | ०२ | १६.६७ |
| ३. | विधवा | ०१ | ०८.३३ |
| **एकूण =** | | **१२** | **१००.००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**शैक्षणिक पात्रता:**

महिला बस वाहकांची शैक्षणिक पात्रता तक्ता क्र. ३ मध्ये दिसून येते. १० वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले महिला बस वाहक सर्वाधिक असून त्यांचे प्रमाण ४१.६७ % इतके आहे. पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या ३३.३३ % महिला बस वाहक आहेत तर पदव्युत्तर पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले ८.३३% महिला वाहक आढळून आल्या.

**तक्ता क्र. ३ शैक्षणिक पात्रता**

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | १० वी पर्यंत | ०२ | १६.६७ |
| २. | १० वी ते १२ वी | ०५ | ४१.६७ |
| ३. | पदवी | ०४ | ३३.३३ |
| ४. | पदव्युत्तर पदवी | ०१ | ८.३३ |
| ५. | इतर | ०० | ००.०० |
| **एकूण =** | | **१२** | **१००.००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**नोकरी स्विकारण्याचे कारण:**

महिला बस वाहकांनी नोकरी करणे का निवडले यामागची करणे शोधली असता आर्थिक अडचणीमुळे नोकरी स्वीकारली असल्याचे ४१.६७% महिला बस वाहकांनी सांगितले. हे प्रमाण इतर कारणांपेक्षा अधिक असून केवळ १ महिला बस वाहकाने आवड असल्यामुळे वाहकाची नोकरी स्वीकारली असल्याचे सांगितले. कुटुंबाला आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने नोकरी करण्याचे निवडले असल्याचे ३३.३३ % महिला वाहकांनी स्पष्ट केले.

हे प्रमाण इतर कारणांमुळे या नोकरीत आलेल्या महिला बस वाहकांच्या प्रमाणापेक्षा दुप्पटीने अधिक आहे. इतर कारणांमुळे बस वाहक नोकरी करत असल्याचे २ महिला बस वाहकाने सांगितले.

**तक्ता क्र. ४ नोकरी स्वीकारण्याचे कारण**

| अ. क्र. | नोकरी स्वीकारण्याचे कारण | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| **१.** | आर्थिक अडचण | ०५ | ४१.६७ |
| **२.** | आवड | ०१ | ०८.३३ |
| **३.** | कुटुंबाला सहाय्य | ०४ | ३३.३३ |
| **४.** | इतर | ०२ | १६.६७ |
| **एकूण =** | | १२ | १०० |
| **बहुलक =** | | | **४१.३३** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**नोकरीसाठी कौटुंबिक सहकार्य:**

महिलांना कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नोकरी करावी लागते. नोकरी करणाऱ्या अशा महिला बस वाहकांना कौटुंबिक प्रोत्साहन/सहकार्य मिळणे अतिशय महत्वाचे असते.

महिला बस वाहकांना कौटुंबिक जबाबदारी व नोकरी या दोन्ही गोष्टी सांभाळताना खूप त्रास सहन करावा लागतो. अशा वेळी नोकरी करावी की नको अशी बिकट अवस्था या महिला बस वाहकांची झालेली दिसून येते.

पुढील तक्ता क्र. ५ महिला बस वाहकांना नोकरीसाठी कौटुंबिक सहकार्य दर्शविते.

विवाहित ४१.६७ % बस वाहकांना त्यांचे पतीकडून नोकरीसाठी प्रोत्साहन व सहकार्य मिळत असल्याचे दिसून आले तर सासू-सासरे व आई-वडील यांचेकडून प्रत्येकी १/४ महिलांनी सांगितले. इतर घटकांनी सहकार्य केल्याचे ८.३३ % महिला बस वाहकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ५ नोकरीसाठी कौटुंबिक सहकार्य**

| अ. क्र. | नोकरीसाठी कौटुंबिक सहकार्य | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | पती | ०५ | ४१.६७ |
| २. | सासू-सासरे | ०३ | २५.०० |
| ३. | आई-वडील | ०३ | २५.०० |
| ४. | इतर | ०१ | ८.३३ |
| **एकूण =** | | **१२** | **१००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**उदरनिर्वाहाचे इतर साधन:**

उदरनिर्वाहाचे इतर साधन कोणते आहे का हे जाणून घेतले असता शेती हे साधन असल्याचे २५ % महिला बस वाहकांनी सांगितले तर सर्वाधिक ५८.३३% महिला बस वाहकांनी इतर कोणतेही साधन नाही असे सांगितले. उद्योग किंवा व्यवसाय हे उदरनिर्वाहाचे इतर साधन असल्याचे १६.६७% आढळून आले.

**तक्ता क्र. ६ उदरनिर्वाहाचे इतर साधन**

| अ. क्र. | उदरनिर्वाहाचे इतर साधन | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | शेती | ०३ | २५.०० |
| २. | उद्योग/व्यवसाय | ०२ | १६.६७ |
| ३. | इतर कोणतेही साधन नाही | ०७ | ५८.३३ |
| **एकूण =** | | **१२** | **१००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**दरमहा उत्पन्न:**

एकूण नमूना निवडीपैकी १/२ (५०%) महिला बस वाहकांचे मासिक उत्पन्न रु. १०,००० ते रु. १५००० इतके असून रु. १५००१ ते रु. २०,००० मासिक उत्पन्न असणाऱ्या महिला वाहकांच्या तुलनेत हे प्रमाण दुप्पट आहे. रु. ३०,००० पेक्षा अधिक मासिक उत्पन्न असणारी एकही महिला बस वाहक आढळून आली नाही.

**तक्ता क्र. ७ दरमहा उत्पन्न**

| अ. क्र. | दरमहा उत्पन्न (रु.) | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | १०,००० ते १५००० | ०६ | ५०.०० |
| २. | १५००१ ते २०,००० | ०३ | २५.०० |
| ३. | २०००१ ते २५००० | ०२ | १६.६७ |
| ४. | २५००१ ते ३०,००० | ०१ | ०८.३३ |
| ५. | ३०००१ पेक्षा जास्त | ०० | ००.०० |
| **एकूण =** | | **१२** | **१००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**कर्ज:**

तक्ता क्र. ८ महिला बस वाहकांनी कर्ज घेतले अगर नाही याचे प्रमाण दर्शवितो. एकूण प्रतिसादयापैकी ३/४ (७५%) महिलांनी कर्ज घेतले असल्याचे तर १/४ (२५%) महिलांनी कर्ज घेतले नसल्याचे सांगितले. यावरून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण कर्ज न घेणाऱ्यांच्या तुलनेत तिप्पटीने अधिक असल्याचे दिसून आले.

**तक्ता क्र. ८ कर्ज**

| अ. क्र. | कर्ज | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | होय | ०९ | ७५.०० |
| २. | नाही | ०३ | २५.०० |
| एकूण = | | **१२** | **१००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**कर्जाचे कारण:**

मुलांचे शिक्षणासाठी कर्ज घेतले असल्याचे ३३.३४% महिला वाहकांनी सांगितले तर सर्वात कमी ८.३३ % महिलांनी आजारपणांसाठी कर्ज काढले असल्याचे दिसून आले. १/४ महिला वाहकांनी घर बांधणीसाठी कर्ज काढल्याचे दिसून आले. मुलांच्या विवाहासाठी कर्ज काढल्याचे ३३.३३% महिला वाहकांनी प्रतिपादन केले.

**तक्ता क्र. ९ कर्जाचे कारण**

| अ. क्र. | कर्जाचे कारण | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | मुलांचे शिक्षण | ०४ | ३३.३४ |
| २. | आजारपण | ०१ | ८.३३ |
| ३. | घरबांधणी | ०३ | २५.०० |
| ४. | विवाह | ०४ | ३३.३३ |
| ५. | इतर | ०० | ००.०० |
| **एकूण =** | | **१२** | **१००** |

**स्त्रोत: क्षेत्रभेट**

**महिला बस वाहकांच्या समस्या:**

आजच्या धावपळीच्या युगात महिला बस वाहकांना नोकरी करत असताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून या महिला आपली सेवा प्रामाणिकपणे बजावत आहेत. असे असले तरी त्यांना पुढील समस्या भेडसावतात.

- महिला स्वच्छतागृहांची असुविधा आहे. काही ठिकाणी बाथरुम आहेत पण ते स्वच्छ नसतात.
- प्रवाशांकडून अभद्र/असभ्य वागणूक
- नवीन तंत्रज्ञानाचे (मशीन) अपुरे ज्ञान
- दूरच्या ठिकाणी – रात्रीच्या उशिरापर्यंत प्रवास
- कामाच्या वेळेत चढ-उतार झाल्यामुळे कौटुंबिक गैरसमजांना तोंड देणे कठीण
- कुटुंबाकडे – विशेषत: लहान मुलांकडे दुर्लक्ष
- बस उशिरा आल्यास महिलांना स्थानकावर राहण्याची व्यवस्था नाही की त्यांना सुरक्षित घरी पोहोचवण्याची व्यवस्था नाही.

याशिवाय, बहुतेक महिला बस वाहकांना सतत उभे राहिल्याने पाय, घोटा/पाय, गुडघे, मांड्या, तळहात/बोटांमध्ये आणि मनगटात तीव्र वेदना होत असल्याचे आढळून आले आहे.

**उपाययोजना:**

महिला बस वाहकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते या समस्यांवर पुढील उपाय प्रभावी ठरतील असे वाटते.

- सर्वच बस स्थानकात महिला स्वच्छतागृहांची पुरेशी सुविधा उपलब्ध करणे.
- महिलांसाठी असलेली बाथरुम वेळोवेळी स्वच्छ राहतील याकडे लक्ष दिले जावे.
- नवीन तंत्रज्ञानाचे (मशीन) अद्ययावत ज्ञान व प्रशिक्षण सर्व महिला बस वाहकांना दिले जावे.
- महिलांना शक्यतो रात्री उशीरापर्यंतची प्रवास ड्यूटी देऊ नये.
- बस उशिरा आल्यास महिलांना स्थानकावर राहण्याची व्यवस्था असावी किंवा त्यांना सुरक्षित घरी पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात यावी.
- महिला बस वाहकांची महिन्यातून एकदा शारीरिक तपासणी केली जावी.

वरील उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास महिला बस वाहकांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यास निश्चितच मदत होईल असे वाटते.

**सारांश:**

प्रवाशांच्या सेवेसाठी हे उद्दिष्ट घेऊन एसटी पुढे जात आहे. एसटीला व महिला बस वाहकांना सध्या प्रवाशांच्या सेवेत व नोकरीत विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामुळे एसटी कर्मचारी- विशेषत: महिला बस वाहक आणि प्रवाशांमध्ये होणारे किरकोळ वाद टाळावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महिलांना बस चालक आणि वाहक म्हणून सेवेत सामावून घेताना त्यांचा अनुभव आणि गुणवत्ता इ. दृष्टीने काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. महिलांना एसटी वाहक म्हणून नोकरीत सामावून महामंडळाने त्यांना जीवन जगण्याचा नवा मार्ग दाखवला आहे. महिला बस वाहकांच्या समस्या विचारात घेऊन महामंडळाने व शासनाने योग्य ती पावले उचलणे अत्यावश्यक बनले आहे. यामुळे महिला बस वाहकांचा सामाजिक व आर्थिक दर्जा निश्चितच उंचावेल.

**संदर्भ:**

1. Bhargavi K. B. (2014) Problems and Challenges of Women Bus Conductor in Andhra Pradesh State Road Transport Corporation (ASPRTC), published in Indian Stream.
2. दैनिक भास्कर, विविध अंक
3. https://indianexpress.com/
4. www.lokmatnews.in
5. www.amarujala.com
6. www.livehindustan.com
7. https://navbharattimes.indiatimes.com/